25

For Official use only

Background Paper on Trible Development ( Marathi ) No. 2 :

1979

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रातील आदिवासी हस्तकला
# आणि
# हस्तकलेचे व्यवसाय

1971

★ ★ ★

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
पुणे ४११ ००१

Background Paper on Tribal Development (Marathi) No. 2 :

# महाराष्ट्रातील आदिवासी हस्तकला आणि हस्तकलेचे व्यवसाय.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र शासन, पुणे - ४११ ००१.

# निवेदन

महाराष्ट्रातील आदिवासींची हस्तकला आणि त्यांच्या हस्तकलेचे व्यवसाय यांची ढोबळमानाने ओळख व्हावी यासाठी ही छोटीशी टिपणी संस्थेचे सहायक अभिरक्षी श्री.उत्तमराव सोनवणे यांनी तयार केली आहे. संस्थेने वेळोवेळी जी सर्वेक्षणे निरीक्षणे आणि संशोधन प्रकल्प केले, त्यामधून व त्याशिवाय आदिवासी संग्रहालय वाढीच्या योजनेतून जी माहिती उपलब्ध आणि तिचा उपयोग टिपणीत केला आहे. आदिवासींचे कौशल्य त्यांच्या हस्तकला आणि हस्तकला व्यवसायातून मुख्यत: दिसून येते. त्यांचा हा सांस्कृतिक वारसा यापुढे वृध्दिंगत करता येईल कां ? कमीत कमी तो जतन तरी करता येईल कां ? अशा प्रश्नांचा व त्याबरोबरच आदिवासींच्या विकासाचा विचार मनांत ठेऊन ही माहिती सादर करत आहोत.

डॉ.गोविंद गारे
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

--oo--

## आदिवासी हस्तकला

आदिवासी जीवन संपूर्णत: निसर्गाच्या सान्निध्यात संपन्न होत असल्याने त्यांच्या हस्तकलेवर निसर्ग व जंगलातील वस्तू, प्राणी व नैसर्गिक कल्पना यांची पकड पहावयास मिळते. कोणतीही कलाकृती ही मुख्यत: त्यांच्या उपयोगासाठीच जरी असली तरी वस्तूशी संबंध फक्त "उपभोग्य" न राहता आत्मिय असतो. आदिवासी कलेचे अनेक पैलू आहेत. वस्तूतील गुणांचा जास्तीत जास्त श्रेयस्कर उपयोग करून स्वत:च्या कल्पनांना मूर्त स्वरूप आदिवासी कलाकार देत असल्याने निर्माण होणाऱ्या वस्तू, चित्र अगर इतर कलाकृतींच्या माध्यमातून आदिवासी कलाकार प्रगल्भ विचार प्रगट करीत असतो. या साऱ्या वस्तूंवर नजर टाकल्यास त्यातून निर्माण झालेले कसब व यासाठी केलेली तपश्चर्या बाहेरच्या माणसाला थक्क करून सोडते. पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या आदिवासी संग्रहालयात आदिवासी हस्तकलेची विविध अंगे जतन केलेली आहेत.

### १. आदिवासी हस्तकलेचे व्यवसाय.

**प्रास्ताविक :-**

आदिवासी हस्तकला त्यांच्या दैनंदिन गरजेतून निर्माण झालेली व परंपरेने चालत आलेली कला आहे. गरजेनुसार आदिवासी स्वत:च्या वस्तू स्वत: बनवितो. अशा वस्तू निर्माण करणाऱ्या आदिवासीला आपण हस्तकला कौशल्याच्या क्षेत्रातील एक कारागीर आहोत याची जाणीवही नसते. वस्तुनिर्मितीचे काम आदिवासी अतिशय एकाग्रतेने करतात. त्यामुळे त्यांच्या हस्तकलाकडे पाहताना एक वेगळाच आनंद मिळतो व वेगळ्याच सौंदर्याची त्यातून जाणीव निर्माण होते. देवदेवतांच्या प्रतिमा तयार करणे. रोजच्या वापरातील वस्तूंची निर्मिती करणे, विविध प्रकारची वाद्ये व सौंदर्य वाढीसाठी विविध साधने तयार करणे यात आदिवासींना विशेष रस असतो. अशाप्रकारच्या विशेष आवडीतून आदिवासी हस्तकलेचा जन्म झालेला आहे. त्यांची ही कला परंपरागत चालत आली आहे. तिच्यात बदलही घडत आले आहेत. त्यातील गुण, कलात्मकता, सौंदर्य हे देखील काळानुरूप बदलत आहेत. रोजच्या वापरातील हत्यारांच्या व साहित्यांच्या सहाय्याने आदिवासी जवळपास मिळणाऱ्या साधनांचा उपयोग करून कला कौशल्याचे दर्शन घडविणाऱ्या वस्तू तयार करतात. हे करीत असतांना आदिवासी विशेषत: धार्मिकतेच्या परंपरागत कल्पना व श्रध्दा यांची सांगड घालतो. उदाहरणाच द्यावयाचे झाल्यास मृतांच्या स्मरणार्थ उभारावयाच्या शिळांचे देता येईल. लाकडी खांबावर केलेल्या कोरीव कामाचा तो अप्रतिम नमुना असतो. या खांबाचा आकार व उंची, त्यावरील नक्षीकाम मृतांच्या सामाजिक

प्रतिष्ठेनुसार कोरलेली असते. त्याचप्रमाणे मृताचे देव म्हणजेच पितर म्हणून तयार करावयाच्या "वाघ्या", "वीर", व "सुपली" वगैरे पितरांच्या प्रतिमा, देवीच्या पुजेची "झांगळी", वारल्यांचा "तारपा", भिल्लाची लग्नबाशिंगाची टोपली, माडिया गोंडाचा "मुंडा", "माता", "देवीचे घोडे", "बडादेवा"ची पालखी, "मरियाम", "तैलरिन", "कनसरी" व "बहिरम" देवांच्या मूर्ती, "सूर्य देव", "चंद्र देवाचे मुखवटे" इत्यादि त्यांच्या कलाकौशल्याचीच अुदाहरणे म्हणून सांगता येतील. "मुंडा" म्हणजे लग्नातील मध्यवर्ती कोरीव नक्षीदार लाकडी खांब. या खांबावर आदिवासी हस्तकलेचा/अुगम त्यांच्या धार्मिकतेतून झाला आहे हे त्यावरून दिसून येते.
आविष्कार पहावयास मिळतो. आदिवासी हस्तकलेचा

विविध प्रकार :-

सभोवतालच्या परिसरातून अुपलब्ध होणाऱ्या साधनांमधून आदिवासी हस्तकलेच्या वस्तू निर्माण करतात. निर्मिती कौशल्य, वस्तूचा रेखीवपणा व हस्तकलेचा प्रकार यांनुसार त्यांच्या हस्तकलेचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

(१) आदिवासींची विविध प्रकाराची व आकाराची पारंपारिक वाद्ये.
(२) दागदागिने व शृंगार साधने (मण्यांच्या माळा, फण्या, डब्या वगैरे)
(३) सुतारकाम, बांबूकाम व घरगुती अुपयोगाच्या वस्तू.
(४) गवतांच्या पिशव्या, टोप्या व विविध सौंदर्य प्रसाधने.
(५) लाकडावरील कोरीव काम व विविध प्रकारचे मुखवटे.
(६) शिकारीची आयुधे, साधने व विविध प्रकारची जाळी.
(७) भिंतीवरील चित्रे व धार्मिक कार्यातील प्रासंगिक चित्रकला.

पारंपारिक आदिवासी वाद्ये :-

आदिवासींना वाद्यांची विशेष आवड आहे. विविध प्रकारची व आकाराची वाद्ये तयार करण्याचा त्यांना छंदही आहे. जनावरे सांभाळणारा गुराखी मुलगा "पावी" अगर "तंडूर" मोठ्या आवडीने वाजवितो. मोठी माणसे लांब भोपळ्याचा "तारपा" वाजवितात. रंगीबेरंगी वाखाच्या गोंड्यांनी, रंगीत मण्यांनी आणि पक्ष्यांच्या रंगीत पिसांनी आदिवासींची वाद्ये सजविलेली असतात. त्यांची वाद्ये तेच तयार करतात. आदिवासी निरनिराळ्या प्रसंगी, प्रसंगाला अनुरूप अशीच वाद्ये वाजवितात. त्यांच्या वाद्य प्रकारातून नवीन वाद्य प्रकार प्रकाशात आणता येतील. "तंडूर" नावाचे गोंडांचे वाद्य आता सर्वत्र लोकप्रिय झाले आहे. "विचित्रवीणा" हा वाद्य प्रकार आदिवासींच्या "झांगळी", "कहाळी" सारखाच आहे. साधी "झांज" अगर भजनाचे टाळ घ्या ? किती विविध प्रकारचे व आकाराचे टाळ आदिवासी बनवितात. अमरावती जिल्ह्यात मेळघाट तळशीलमधील कोरकुंचे लाकडी गप्पा, टप्पा

..३

मंजिरा टिचकुरी हेही टाळाचेच प्रकार आहेत. भिल्लांच्या इंदल पूजेतील "झाम्को" हाही अेक प्रकारचा टाळच आहे. शिवाय टप्पा हे वाद्य अेकाच प्रकारचे नाही. चौकोनी, षटकोनी, गोल, भरीव, पोकळ असे टप्प्याचे अनेक आकार व प्रकार आहेत. माडिया गोंडाची टिचकरी हे वाद्य नृत्याचे वेळी आवाज करून साथ देण्यासाठी वाजविले जाते. लाकडास बाकदार पण धनुष्याकृती कोरून टिचकुरीच्या दोन्ही टोकांना गोल अगर चौकोनी आकार देतात. पावलांच्या लयबध्द हालचालींना या वाद्याने साथ देता येते. महाराष्ट्रातील आदिवासी लोक तयार करत असलेली विविध वाद्ये व त्यांच्या निर्मितीसंबंधीची थोडक्यात माहिती तक्ता-अ मध्ये दिली आहे.

तक्ता - अ

| अ.क्र. | हस्तकलेचा प्रकार | वापरावयाच्या वस्तू | निर्माण केली जाणारी वस्तू | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | आदिवासींची वाद्ये | (अ) भोपळा, ताडपाने, तारपा, बांबू, मेण इत्यादि. | तारपा | जव्हार , मोखाडा व , तलासरी (ठाणे,) त्रिंबक नाशिक, हरसूल (नाशिक.) |
| | | | झांगळी | जुन्नर, पुणे, अकोला, (अहमदनगर) जव्हाण , वाडा ठाणे, मोखाडा ठाणे, डहाणू (ठाणे.) |
| | | | बीरी | अक्कलकुवा, धुळे, अक्राणी, (धुळे,) चोपडा, (जळगांव.) |
| | | | पावरी | अक्कलकुवा , अक्राणी व शिरपूर धुळे, चोपडा जळगांव. |
| | | (ब) लाकुड, प्राण्यांचे केस, कातडे, तार, माती, इत्यादि. | हिरोबाई, रोथ्या, भिळड्रम | किंगरी, परभणी, नांदेड, कि ल्दे अक्राणी , नवापूर , नंदुरबार धुळे, शहादा (धुळे,) चोपडा, (जळगांव.) |
| | | | वायसनहार्न डान्स ड्रम. | सिरोंचा (चंद्रपूर.) |
| | | | ढिमकी | मेळघाट (अमरावती.) |
| | | | फरा | किनवट, (नांदेड,) केळापूर. (यवतमाळ) |
| | | | सीत्रे | सिरोंचा, (चंद्रपूर.) |

| अ.क्र. | हस्तकलेचा प्रकार | वापरावयाच्या वस्तू | निर्माण केली जाणारी वस्तू | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | प्राण्यांच्या शिंगाचे बिगुल | सिरोंचा,(चंद्रपूर.) |
| | | | ताडाच्या पानाचे बिगुल. | सिरोंचा,(चंद्रपूर.) |
| | | | सनई, शहनाई. | सिरोंचा,(चंद्रपूर.) |
| | | | सारंग | चंद्रपूर, सिरोंचा, राजूरा, (चंद्रपूर.) |
| | | | टप्पा गप्पा | मेळघाट,(अमरावती.) |
| | | | चटकोरा टिचकुरी | गडचिरोली, सिरोंचा, (चंद्रपूर.) |

दागदागिने :-

आदिवासी विभागांत विविध नमुन्यांचे दागदागिने दिसतात. धातूपासून तयार केलेले विविध घाटाचे दागदागिने सर्वच आदिवासी जमातीत वापरतात. परंतु धातूपासून बनविलेल्या दागदागिन्यांची आवड मात्र धुळे, जळगांव जिल्ह्यातील भिल्ल व मेळघाटच्या कोरकू जमातीत अधिक दिसते. भिल्ल, कोरकू, येवढीच धातूंच्या दागिन्यांची आवड गडचिरोली तहसीलमध्येही आढळते. इतर ठिकाणी मण्यांच्या माळांचा वापर अधिक केला जातो. भामरागड भागातील माडिया तरुणींच्या गळ्यात मण्यांचे नानाविध हार दिसतात. धातूचे निरनिराळे हार, साखळ्या जळगांव जिल्ह्यातील पावरा लोकांच्या, धडगांव भागातील मथवाडी भिल्ल स्त्रियांच्या अंगावर दिसतात. "कालमुद्या" व "कथिमुद्या"सारख्या चित्रविचित्र "हसली" सध्या चंद्रपूर जिल्ह्यात महाव्यास मिळतात. लहान मुलांच्या कमरेला "करदोडा" बांधलेला असतो. त्यांतही आदिवासींची सौंदर्यदृष्टी असते. करदोड्यात लहान लहान नाजुक आवाजाची घुंगरे बांधलेली असतात. माडिया गोंड नृत्यासाठी घुंगरांचे विविध पट्टे बनवितात. गुजराथ सीमेलगतच्या भिल्लांमध्ये गवताचे विविध दागिने तयार करतात. त्यांचे सूक्ष्म आकार पाहून भिल्ल लोक असे नयनमनोहर दागिने बनवितात हे कोणालाहेखील वाटणार नाही. राठवा, भिल्ल, कोरकू, गोंड, हलबा, कोलाम यांच्या भागांत दागिने घडविण्याचे काम केले जाते. पारंपारिक घडण आता मागे पडू लागली आहे. धंदेवाईक लोकांनी आदिवासींची ही कला अुचलली आहे. गडचिरोली तालुक्यातील कोरचीच्या आठवडे बाजारात, मेळघाटमधील हरिसालच्या आठवडे बाजारात कांही दुकाने केवळ आदिवासींचे दागदागिने विकणारी असतात. मध्य प्रदेशातील बैतुल

जिल्ह्यातील मैसदेहीहून ८०-९० मैल व इतर ठिकाणाहून - केवळ दागिने विकण्या साठी येणारे सोनार, ओतारी, अतार यांची संख्या कितीतरी असते. अनेक प्रकारच्या "मुंदी" म्हणजे आंगठ्या बाजारात पहावयास मिळतात. आदिवासींचेही स्वत:चे सोनार होते, त्यांना "ओझा" म्हटले जाई. घट्वा पध्दतीत ते दागिने बनवित. आधुनिक बाजारातील स्पर्धेत ते आता मागे पडले आहेत. निरनिराळ्या आकाराच्या फण्या आदिवासी स्वत:च तयार करीत. चंद्रपूर जिल्ह्यात अशा फण्यांचे विविध प्रकार आजही पहावयास मिळतात.

घरासाठीची साधने व घरगुती अुपयोगाच्या वस्तू :-

आदिवासींच्या घराघरांत त्यांच्या हस्तकलेचे नमुने आढळतात. ठाकर, कातक-यांच्या झोपड्या अुभ्या आडव्या कारवीच्या कुंडाच्या, फळ्या, सागाची पाने, व गवताने शाकारलेल्या असतात. महादेव कोळी, कोकणा आणि ... भिल्लांच्या घरासाठी भरपूर लाकडांचा वापर केलेला असतो. कोरकुंची घरे मात्र निराळ्या पध्दतीने बांधलेली असतात. चार लांब भिंती त्यांना "कंबर" म्हणतात. त्याच्या सहाय्याने तीन लांबट खोल्या काढलेल्या असतात. पुढची व मागची खोली मधलीपेक्षा अरुंद असते, व छप्पर अुतरते असते. भिंती माती व भाताच्या काडाच्या चिखलगा-यापासून थापून अुभ्या केलेल्या असतात. घर बांधण्यासाठी पाथरवट मुद्दाम बोलावण्यांत येतो. हलबांची घरेही अशीच परंतु लांबी कमी पण अुंच असतात. घराच्या बाहेरच्या भिंती कोरुन त्यांना विविध आकार दिलेले असतात. भिंती शाडूने सारवून त्यावर गेरुने चित्रे काढलेली असतात. हलब्यांच्या घरासाठी वापरलेल्या लाकडावर प्राण्यांची, वनस्पतींची सुंदर चित्रे व निरनिराळे आकार व विविध नक्षीकाम केलेले असते. गडाच्या अधिपतींची घरे कलाकौशल्यांच्या दृष्टीने महत्वाची आहेत. विविध प्रकारचे कोरीव काम तेथे पहावयास मिळते. अशाप्रकारची लाकडी कोरीव काम केलेली घरे "मोखाडा" तहसीलमध्ये नवापूर, अक्कलकुवा व सुरगाणा तहसीलमध्येही पहावयास मिळतात. भिल्लांच्या घरांवर प्राण्यांचे आकार बसविलेले असतात. आदिवासींच्या घरगुती अुपयोगाच्या वस्तूंमध्ये मातीच्या भांड्याचा वापर अधिक आढळतो. वाडगी, माठ, तवा इत्यादींचा त्यामध्ये समावेश होतो. मातीची गाजणी चमकदार काळा रंग येईपर्यन्त केलेली असते. घानो-याला भांड्यांची पुढीलप्रमाणे पध्दत पहावयास मिळते. प्रथम माती चाळून घेतात. नंतर दोन-तीन दिवस पाणी घालून माती पातळ करुन ठेवून देतात. तिस-या दिवशी ती अुपसून अुघड्यावर सावलीत पसरुन फेकतात व चांगली सुकू देतात. चौथ्या दिवशी सकाळीच तुडवून त्याचा नरम व मऊ गारा करतात व त्यानंतर तिच्यापासून विविध आकार देअुन वस्तू व वस्तुंवरील नक्षीकाम केले जाते.

..६

मातीच्या भांड्याबरोबरच औलूकाभूस सापडणाऱ्या भोपळ्याचा अुपयोगही आदिवासी भांड्यांसारखा करतात. झऱ्यातून पाणी अुपसून पेण्यासाठी, पाणी पिण्यासाठी, ताडी गोरगा झाडावरून काढण्यासाठी, तेल ठेवण्यासाठी, आणि जंगलात पाणी नेण्यासाठी भोपळ्याचा अुपयोग होतो. पाण्यासाठीच्या भोपळ्या-भोवती बांबूच्या बारीक कामट्यांनी विणून घेतात किंवा झाडाच्या सालींनी विणून घेतात. बारीक देठाच्या लांब व शेवटी फुगीर आकाराच्या भोपळ्यांना फुगीर ठिकाणी गोल भोक पाडून आतील गर व बीया काढून टाकतात. अशा भोपळ्यांच्या देठाकडील लहान भोक पाडतात. याचे अनेक अुपयोग केले जातात. मद्यपानासाठी याचा अुपयोग केला जातो. भिल्ल लोक अशाच भोपळ्याची गुडगुडी करतात. आदिवासी झाडांच्या पानांचे द्रोण व पत्रावळ्या सहजतेने बनवितात. मेळघाटमधील कोरकू धान्य साठविण्यासाठी मातीचे साठवण तयार करतात. धान, कोसगी, नागली इत्यादी धान्यांची टरफले काढण्यासाठी जत्तीचा अुपयोग होतो. अशाप्रकारची लाकडी ... ठाणे, नाशिक, जळगांव भागातील आदिवासी वापरतात. "चाटू" ही गोंडाची लाकडी पळी, पीठ ...ण्यासाठी लाकडाची "काथवट" ते वापरतात. घरगुती वस्तूंमध्ये खाटाचे अनेक प्रकार आढळतात. माडिया गोंडाच्या "बाजा" बांबूच्याच असतात. वीणही बांबूच्या पातळ पट्ट्यांची असते. झाडाच्या ओल्या सालींनी विणलेल्या खाटाही हे लोक वापरतात. अशा खाटा विणताना विविध प्रकारचे नक्षीकाम केलेले असते. नक्षीकामाच्या रेषा आणि विण यांनी तयार झालेल्या सुंदर सुंदर आकृत्या मनोवेधक असतात. बांबूची भांडीही करून वापरतात. आदिवासी क्षेत्रात बांबूच्या विविध आकाराच्या टोपल्या सर्वत्र बनविल्या जातात.

<u>बांबूकाम :-</u>

बांबूकाम ही अेक आदिवासींची हस्तकला आहे. आदिवासींनी बांबूच्या बनविलेल्या टोपल्यांचा आकार व विणकाम या सर्व दृष्टींनी बांबूकाम अप्रतिम असते आणि विविध अुपयोगाच्या टोपल्या ते तयार करतात. त्यांना "साकुरी", "वीया", "फुलोरी", "हेटे साकुरी" म्हणतात. आदिवासींच्या या हस्तकला व्यवसायाचा चांगला अुपयोग होण्यासारखा आहे.

आदिवासी विविध प्रकारचे धनुष्यबाण बांबूपासून बनवितात. बांबूच्या छामट्यांनी विणलेला तट्टया घरांच्या भिंतीसाठी अुपयोगाला येतो. बांबूची भांडीही आदिवासी बनवितात. शिकारीच्या अनेक हत्यारात बांबूच्या साधनांचा अुपयोग होतो. "तेलेडुंका" हे अेक असेच माडिया गोंडाचे मासे पकडण्याचे साधन चार-पाच फूट लांबीच्या पोकळ बांबूपासून हे बनविलेले असते. अेक बाजू चिरून अनेक कांबी केलेल्या असतात. या चिरलेल्या "छामट्या" दोऱ्याने अगर वाखाच्या बारीक दोरीने

विशिष्ट पध्दतीने विणून घेतात तर दुसरी बाजू अखंड असते. हस्तकौशल्य व विविधता या दृष्टीने खालील भागात ही हस्तकला आढळून येते.

| हस्तकला | प्रकार | निर्माण झालेली वस्तू | तालुका | जिल्हा |
|---|---|---|---|---|
| बांबूकाम | वाद्ये | पावूल (पावा) | केळापूर वणी | यवतमाळ |
| | पावसाची छत्री | रेली | ऐटापल्ली, भामरागड भाग | चंद्रपूर. |
| | | इरले | जव्हार | ठाणे |
| | | | मोखाडा | ठाणे |
| | | | तलासरी | ठाणे |
| | | | सुरगाणा | ठाणे |
| | | | जुन्नर | पुणे |
| | | | आंबेगांव | पुणे |
| | | | अकोला | नगर |
| | | | [illegible] व इतरत्र | |
| | मासे पकडण्याचे साधन | केडेडुका, भीलडे, साटा भीलड व इतर फास | सिरोंचा → | चंद्रपूर |
| | | | | ठाणे, नाशिक. |
| | | टोपल्या | सर्वत्र आदिवासी विभागात. | धुळे, जळगांव, चंद्रपूर, अमरावती. |
| | | पक्षी पकडण्याचे फासे. | सिरोंचा | चंद्रपूर |
| | | धनुष्यबाण. | सिरोंचा | चंद्रपूर |
| | | | चोपडा | जळगांव |
| | | | अक्राणी | धुळे |
| | | फण्या | सिरोंचा | चंद्रपूर. |

मण्यांच्या माळा, फण्या, डब्या इ. वैयक्तिक शृंगाराची साधने :-

मण्यांच्या माळा बनविण्याची आवड आदिवासींत आहे. गळ्यात, फेट्यावर, कपाळावर, हातात, केसावर, केसांत, कमरेला बांधण्यासाठी आदिवासी "मण्यांच्या माळा" तयार करतात. लाकडी मणी आदिवासी घरीच तयार करतात. लहान फळांच्या "बीया" व रंगीबेरंगी दगड जंगलातून जमवून त्याचाही ते वापर करतात. नकली मणी आठवडे बाजारातून ते विकत आणतात. मणी आवडीनुसार रंगीबेरंगी दो-यात ओवतात. "डुम्मे", "गोपीन डुम्मे", "मुगे", "मोतीने डुम्मे" असे मण्यांच्या माळांचे प्रकार आदिवासी तयार करतात.

..८

"फण्या" आणि "डब्या" बनविण्यांत माडिया गोंड कुशल आहेत. माडिया गोंड तरुण-तरुणींमध्ये "हिचाडी-फणी" ही प्रेमाचे प्रतीक समजली जाते. त्यामुळे माडिया तरुण-तरुणी अशा फण्या जास्तीत जास्त आकर्षक आणि कलात्मक बनविण्याचा प्रयत्न करतात. बांबूच्या [illegible] चा काडी ऐका टोकास दोऱ्याने बांधून फणी तयार केली जाते. फण्यांच्या अनेक प्रकारांत ही बांधावयास अवघड परंतु दिसण्यात आकर्षक असते.

माडिया गोंड जमातीत तंबाखूच्या डब्याही बनवितात. चंद्रपूर जिल्ह्यात ऐटापल्ली भामरागड भागात अशा डब्या घरोघर आढळून येतात. अशा डब्यासाठी लाकूड कोरुन वरील भागावर नक्षीकाम केले जाते. शिशाच्या रसाचा पातळ मुलामा डबीवर दिला जातो. त्यामुळे ती भक्कम होते. माडिया लोक धातूंच्याही डब्या बनवितात. विविध प्रकारच्या नक्षीने नटलेल्या डब्या पाहून त्यांच्या कला-कौशल्याची प्रचिती येते. कठिण कवचाच्या फळांचा उपयोगही डब्यांसाठी केला जातो. "कोरकू" लोकही अशा प्रकारच्या डब्या बनवितात.

गवताच्या टोप्या, पिशव्या इ. वस्तू :-

ठाणे जिल्ह्यातील जव्हार भागात वारली व कोकणा जमातीची मुले गवत-तणापासून विणून टोप्या बनवितात. "फेल्टहॅट"सारख्याच या टोप्या दिसतात, गवताची चमदार सोनेरी झाक त्यावर असते. टोप्यांप्रमाणेच "टोपलीच्या" आकाराच्या लहान लहान पिशव्याही गवतापासून बनविल्या जातात. नाशिक जिल्ह्यातील पेठ भागात असे कारागिर आहेत. "लेडिज पर्स" म्हणून याचा उपयोग सहज होऊ शकेल. गवताच्या काड्यांची खेळणीही आदिवासी लोक तयार करतात. त्याचप्रमाणे अनेकविध तोरणेही बनवितात. घरांत शोभेसाठी ठाणे जिल्ह्यातील आदिवासी तांदळाच्या लोंब्या व गवताचे तुरे यांच्या सुरेख आकृत्या बनवितात. चंद्रपूर जिल्ह्यांत शिंदीच्या पानांच्या सुरेख मुंडावळ्या बनवितात. गवताच्या चुंबळीही तयार केल्या जातात.

गवताची हस्तकला खालील भागात अस्तित्वात आहे :-

| प्रकार | | तालुका |
|---|---|---|
| गवताच्या टोप्या | .. | जव्हार - नाशिक |
| गवताच्या पिशव्या | .. | पेठ - चंद्रपूर |
| गवताचे बटवे | .. | सिरोंचा - चंद्रपूर. |
| पानांच्या मुंडवळ्या | .. | सिरोंचा - चंद्रपूर. |

## लाकडावरील कोरीव काम :-

लाकडावरील कोरीव कामात महाराष्ट्रातील अनेक आदिवासींचे कौशल्य दिसते. पांगा-याचे लाकूड कोरून वारली व कोंकणा "भवाड्याचे" मुखवटे तयार करतात. . घरासाठी वापरावयाचे लाकडावर हेलबा लोक नक्षीकाम करतात. पक्षी, प्राण्यांचे आकार कोरतात. गोंड व माडिया गोंड आणि कोरकू लग्न समारंभासाठी मध्यवर्ती खांब "मुंडा" तयार करतात, त्यावर विविध प्रकारचे कोरीव काम करतात. मृतांच्या स्मरणार्थ उभारावयाची स्मारके "शिणाली" "मरसिंग मुंडा" निरनिराळ्या आकाराचे असतात. "वाघ्या" दैवत करण्यासाठी लाकडावर कोरीव काम केलेले असते. अशा प्रकारे अनेकविध आकार व प्रकारच्या लाकडी कोरीव वस्तू आदिवासी करीत असतात. हस्तकला व्यवसायातील आदिवासींची कुशलता मोठी आहे. ती लक्षात घेऊन मध्य प्रदेशातील जगदालपूर येथे श्री. अरुण गुहा यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या सहाय्याने "डाँसिंग कॅक्टस्" नावाची संस्था सुरू केली आहे. लाकडी कोरीव कामात वाकबगार असलेल्या माडिया, मुरिया आदिवासींना इथे प्रशिक्षण, प्रशिक्षित शिक्षकांचे मार्गदर्शनाखाली दिले जाते. आदिवासी पुरुष एकटा प्रशिक्षणाला निवडला जात नाही. त्या आदिवासीचे सारे कुटुंब संस्थेत बोलावले जाते आणि त्या कुटुंबाला प्रशिक्षण दिले जाते. १९६० पासून आतापर्यंन्त नॅशनल हॅंडिक्राफ्ट टॅलेन्ट स्पर्धेमध्ये लाकडी कोरीव कामासाठी पहिल्या क्रमांकाची १६ विविध बक्षिसे या संस्थेच्या विद्यार्थ्यांना मिळाली आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींची ही कला जोपासण्यास खेखील वाव आहे.

या हस्तकला कौशल्याची महाराष्ट्रातील काही ठिकाणे खाली दिली आहेत

| हस्तकला | निर्माण झालेली वस्तू | तहसील | जिल्हा |
|---|---|---|---|
| आदिवासी .. | १) तंबाखूच्या डब्या "पोआ तिहाणा, घोटा" | सिरोंचा | चंद्रपूर. |
| | २) "मुंडा" लग्न खांब | मेळघाट | अमरावती. |
| | | गडचिरोली | चंद्रपूर. |
| | | राजुरा | चंद्रपूर. |
| | | सिरोंचा | चंद्रपूर |
| | ३) फण्या "हिचाडी" | सिरोंचा | चंद्रपूर. |
| | ४) "शिणाली" मृतांच्या स्मरणार्थ | मेळघाट | अमरावती. |
| | उभारावयाचे खांब. | सिरोंचा | चंद्रपूर. |
| | ५) मुखवटे | अक्राणी | धुळे. |
| | | पेठ | नाशिक |
| | | चोपडा | जळगांव |
| | ६) घरासाठी लाकडी कोरीव काम | गडचिरोली | चंद्रपूर. |
| | | साकोली | भंडारा |

आदिवासी हस्तकला कौशल्याच्या काही अंगांचा वर अुल्लेख केला आहे. याशिवाय शेतातली बुजगावणी तयार करण्यांत त्यांच्यामध्ये कलाकौशल्याच्या दृष्टीने वाखाणण्याजोगी विविधता आढळून येते. शिकारीची विविध हत्यारेही महाराष्ट्रातील आदिवासी तयार करतात. आदिवासी हस्तकला कौशल्यात मातीच्या देवता व लाकडी आणि मातीच्या प्राण्यांचा अुल्लेख करावा लागेल. मेळघाट भागात दिवाळीच्या दिवसांत मातीचे हत्ती बनवून त्यावर छोट्या छोट्या पणत्या बसविलेल्या दिसतात. यवतमाळ जिल्ह्यात वणी व चंद्रपूर जिल्ह्यांत गडचिरोली व सिरोंचा तहशिलमध्ये देवीस अर्पण करण्यासाठी मातीचे हत्ती, घोडे, बैल इत्यादी प्राणी तयार करतात. मातीचे देव धुळे व नासिक जिल्ह्यांत तयार केले जातात.

आदिवासींची चित्रकला ही सूचित (सांकेतीक) चित्रकला आहे. आदिवासी सहसा हेतूशिवाय चित्र काढीत नाहीत. भिंतीवर काढावयाची चित्रे आदिवासी जमातीच्या हेतू व संकेतानुसार ठरलेली असतात. भरपूर पाऊस पडण्यासाठी बेडकाची चित्रे ते रंगवतील तर दुष्टात्म्यास घरापासून दूर ठेवण्यासाठी "सूर्यदेव" "चंद्रदेव" यांची चित्रे रंगवतील. मेळघाटमधील कोरकूमध्ये "स्वस्तिक" फार प्रिय आहे. गडचिरोलीमध्ये "बडादेव" प्रिय आहे. आदिवासींच्या चित्रकलेत खालील नमुने आढळतात. :

(१) भिंतीवरील चित्रकला.

(२) गोणपाटावरील चित्रकला.

(३) धार्मिक विधिच्या वेळी धान्याने काढलेली चित्रे.

अंगावरील गोंदण हाही चित्रकलेचाच अेक प्रकार आहे. डहाणू तालुक्यातील आदिवासी तरुणांस चित्रकलेच्या क्षेत्रात राष्ट्रीय पारितोषिक मिळाले आहे व त्यांच्या अनेक चित्रांची आर्ट गॅलऱ्यांमधून प्रदर्शने झालेली आहेत. आदिवासींच्या घरांच्या भिंतीवर अशी चित्रे पहावयास मिळतात. ठाणे जिल्ह्यात डहाणू, तलासरी, मोखाडा, नाशिक जिल्ह्यात सुरगाणा, बागलाण तालुक्याचा साल्हेर मुल्हेरचा भाग धुळे जिल्ह्यात अक्राणी महाल, अमरावती जिल्ह्यात मेळघाट, चंद्रपूर जिल्ह्यात गडचिरोली व भंडारा जिल्ह्यातील साकोली तहसीलमध्ये आदिवासींच्या चित्रकलेचे विविध नमुने पहावयास मिळतात.

आदिवासींच्या हस्तकलांच्या संदर्भात आणखी अेका कलेचा अुल्लेख अपरिहार्य आहे. "भवाडा" या नृत्य प्रकारासाठी कागदाचे विविध मुखवटे ठाणे, नाशिक, जिल्ह्यात बनविले जातात. आदिवासी नृत्यांमध्ये मुखवटे सर्वत्र वापरतात. भोपळे रंगवून, लाकडे कोरून असे मुखवटे तयार केले जातात. मुखवटे वापरून सोंगे घेण्याची आवड त्यांना आहे. कागदाचे मुखवटे बनविण्याची त्यांची हस्तकला विशेष प्रयासाची

व कौशल्याची आहे. रद्दी कागद साधारणत: २५ ते ३० दिवस भिजत ठेवतात. भिजलेल्या कागदामध्ये मेथी भिजवून घालतात. हे मिश्रण चांगले कुटून घेऊन त्याचा लगदा तयार करतात. घावड्याचा थोडा डिंकही त्यात वापरतात. हा लगदा तयार झाल्यावर निव्वळ कल्पनेतील आकार ते तयार करतात. ही हस्तकला आता मागे पडू लागली आहे. निसर्गात निर्माण होणाऱ्या रंगाची जागा आता रासायनिक रंग घेऊ लागले आहेत.

आजच्या आधुनिक जगात यंत्रांच्या सहाय्याने निर्माण केल्या जाणाऱ्या वस्तूंमुळे सर्व क्षेत्रांत क्रांती झालेली आहे. अशा वस्तूंचा शिरकाव आदिवासी भागातही झालेला आहे. आदिवासी गरजेनुरूप वस्तू बनवीत आला. आता तो गरजेनुरूप बाजारात वस्तू शोधताना दिसू लागला आहे. स्वत:वर तो अवलंबून होता तो आता हळूहळू परावलंबी होत आहे. यंत्रनिर्मित वस्तूंकडे आदिवासी आकर्षित होत आहे व त्यामुळे त्याच्या पारंपारिक हस्तकलांकडे दुर्लक्ष होत आहे. बाजारी वस्तूंमुळे तो परिश्रम करण्यास तयार होत नाही असे आढळून येते. आदिवासींची हस्तकला आदिवासींमध्ये उदासिनता व कृत्रिम आकर्षणता निर्माण झाली तर, हळूहळू नष्ट होत जाईल. त्यासाठी महाराष्ट्रात "डॉसिंग कॅक्टस्" सारख्या संस्था उभाराव्याची गरज आहे.

## (२) आदिवासी हस्तकला : बांबूकाम.

महाराष्ट्रात - ३-४ जातीचे बांबू विपुल प्रमाणावर तयार होतात. परिचित अशा बांबूच्या दोन जाती आहेत : १) भरीव बांबू आणि (२) पोकळ बांबू. वेत हाही बांबूचाच एक प्रकार आहे. खालील दोन जातींचे बांबू सर्वत्र आढळतात.

(१) Denirocalamus strictus

(२) Bambusa Arundinacea.

या जातीच्या बांबूस काटस बांबू असेही नांव आहे. या सर्वत्र वाढणाऱ्या बांबूच्या जातीखेरीज महाराष्ट्र राज्यात बांबूच्या इतर कांही जाती आढळून येतात. त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

(३) तणुकांड वंशाचा बांबू Dendrocalamus Hamiltonil

(४) भीम वंशाचा बांबू Dendrocalamus Giganteus.

(५) शोभीवंत बांबू. Cephalostachyum Fuchishianum

आसाममध्ये फार मोठ्या प्रमाणावर बांबूची पैदास केली जाते. महाराष्ट्र राज्यात बांबूची स्वतंत्र लागवड कागद उत्पादनासाठी केली जाते. ती मुख्यत:

व भंडारा जिल्ह्यातून केली जाते. चंद्रपूर
विदर्भाच्या चंद्रपूर, यवतमाळ/जिल्ह्यातील अल्लापल्ली व भागरागड वनक्षेत्रात चांगल्या प्रतीचा बांबू होतो. याच जिल्ह्यात सिरोंचा, राजुरा, गडचिरोली, कोठारी व मूल भागातही बांबू वाढतात. परंतु त्यांची प्रत कमी दर्जाची असते. यवतमाळ जिल्ह्यात यवतमाळ, पांढरकवडा, वणी, दारव्हा ह्या तहसीलमध्ये, जळगांव जिल्ह्यातील सातपुडा पर्वतांच्या रांगांमध्ये आणि धुळे, ठाणे व नाशिक जिल्ह्यातील काही जंगलातून बांबूचे उत्पादन मिळते.

नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यातही थोड्याफार प्रमाणात बांबू मिळतो. आसाममध्ये ३० ते ३५ मीटर उंचीपर्यन्त बांबूची वाढ होते. महाराष्ट्रात अशी वाढ २५ ते ३० फूटापर्यन्त होऊ शकते. याशिवाय कांही छोट्या जातीचे बांबूही महाराष्ट्रात होतात.

सह्याद्री, सातपुडा व गोंड वनातील बांबू उत्पादनाच्या क्षेत्राचा विचार केल्यास, हा भाग प्रामुख्याने आदिवासींच्या वास्तव्याचा आहे. स्थानिक लोक बांबूंना विविध नांवानी ओळखतात. आदिवासी त्यांच्या स्थानिक भाषेत बांबूंना "भोंग्या", "मैस", "माठोन" "येल" "कळक", "उंडा", "वेळू" व "बांबू" अशा नांवानी ओळखतात. "वारली" आदिवासी बांबूला "टोकर" म्हणतात. "माडियाा" व "गोंडी" भाषेत बांबूला अनुक्रमे "वेदूर" आणि "वोगु" म्हणतात.

बांबूचे नैसर्गिक सान्निध्य व बांबूच्या विविध उपयोगांमुळे आदिवासी जिवनात बांबूचे महत्व अधिक आहे. आदिवासी लोक टोपल्या विणण्यासारखे बांबूकाम हा सगळ्यात सोपा हस्तव्यवसाय समजतात. त्यामुळे बांबूकाम किंवा "बास्केट्री" हा आदिवासींचा अेक उद्योग बनला आहे. आसाम, नागालॅण्डमधील आदिवासींमध्ये बांबूपासून विविध प्रकारच्या वस्तू बनविणे, त्या रंगविणे हा अेक मोठा मान्यवर उद्योग झाला आहे. हे लोक बांबूच्या प्रेक्षणीय, सजावटीसाठी उपयोगात येऊ शकणाऱ्या व भेट देण्यालायक वस्तू बनवितात. खेळणी व घरगुती वापरातील विविध प्रकारच्या वस्तूही बनवितात. महाराष्ट्रात आदिवासी अेवढ्या मोठ्या प्रमाणावर बांबूकाम करीत नाहीत. काही भागातील विशेषत: चंद्रपूर, भंडारा, ठाणे, नांदेड ह्या विभागांतील आदिवासी बांबूपासून काही वस्तू बनवितात. टोपल्यांचा उपयोग त्यांना अनेक कारणांसाठी होतो. खाण्या-पिण्याचे पदार्थ ठेवण्यासाठी, धान्य ठेवण्यासाठी, धान्य साठविण्यासाठी व बाजार-रहाटासाठी टोपल्यांचा सर्रास वापर केला जातो. कोंबड्यांची खुराडी व पक्ष्यांचे पिंजरेही बांबूचेच बनवितात. कामाची भिन्नता लक्षात घेऊन आदिवासी अनेक आकाराच्या टोपल्या तयार करतात, व दैनंदिन कामासाठी त्याचा वापर करतात. वी-विणणे

ठेवण्यासाठी टोपली वेगळी, पाभरीवर पेरणीसाठी टोपली वेगळी, बीया ठेवण्या-
साठी टोपली वेगळी, माती वाहण्यासाठी टोपली वेगळी, काही आदिवासी लोक
घरातले देव टोपलीत ठेवतात, तर पूजेसाठीही टोपलीचा वापर करतात. बहुधा जुन्या
झालेल्या टोपल्या बदलण्यासाठी आदिवासी टोपल्या बनवितात. त्यामुळे "बाजार"
विचारात घेऊन विक्रीसाठी फार थोड्या टोपल्या बनविल्या जातात. अशा
टोपल्यांना आदिवासी लोक "शिकोशी"."किराही", "डाली", "छालगी",
"साकुरी", "विकूरा", "हैसाकुरी" इत्यादि नांवानी संबोधतात.

गेल्या शतकापर्यंन्त आदिवासींचे पारंपारिक अुद्योग त्यांचा इतरांशी कमीत
कमी संपर्क आल्यामुळे सुरक्षित होते. असा संपर्क इतरांशी आल्यावर सामाजिक
अभिसरण सुरू झाले. त्यामुळे पारंपारिक अुद्योगांना अुतरती सुरू झाली. १८७१
साली पहिली जनगणना झाली. तोपर्यंन्त बाहेरच्या लोकांना आदिवासी संस्कृतीची
ओळख झालेली नव्हती. त्यांच्या पारंपारिक कला, हस्तकला व त्यांचे हस्तोद्योग
हे अेक प्रकारच्या सामाजिक संरक्षणाखाली परंपरागत पध्दतीने चालत होते. बाह्य
समाजाशी संपर्क वाढल्यानंतर बाहेरील प्रगतशील व यंत्रनिर्मित हस्तकला व हस्तोद्योगांचा
प्रभाव वाढला. यंत्राव्दारे निर्माण होणाऱ्या सुबक वस्तुंनी आदिवासी हस्तकला व
हस्तोद्योगांशी स्पर्धा निर्माण केली. ह्यात अर्थात यंत्रनिर्मित वस्तूंचा विजय होणार
हे अुघडच होते.

"बांबूकाम" हस्तोद्योगातून निर्माण केलेली वस्तु, हीं केवळ वस्तू नसते. अशी
वस्तू ही "अुपयोगी कला" वस्तू ( Funettonal Arts ) असते. अशा कलावस्तूंची
अुपयुक्तता आणि सामाजिक वैशिष्टये लक्षात घेऊन त्यांचा अभ्यास करावा लागेल.
आदिवासी केवळ "कला" म्हणून बांबूच्या वस्तू निर्माण करीत नाहीत, तसेच छंद
म्हणूनही या वस्तूंची निर्मीती ते करीत नाहीत. अशी वस्तू प्रथम गरज भागविणारी
वस्तू म्हणून निर्माण होते. त्यानंतर कलावस्तू ठरते. आदिवासींच्या कलावस्तूंमध्ये
सामाजिक वैशिष्टये, व्यक्तिगत आवड आणि तिची अुपयुक्तता हे गुण असतात.

आदिवासींच्या बांबूकामामधील पारंपारिकता नजरेआड करून चालणार नाही.
अलिकडे बांबूकामावर बाह्य अनुकरणाचा थोडासा परिणाम झाला आहे. परंतु मूळ
पारंपारिक स्वरूप मात्र पूर्णतः बदललेले नाही. म्हणून बांबूच्या वस्तुकडे पाहता
पारंपारिक दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे.

वस्तू बनविण्याच्या पारंपारिक हस्तकौशल्य कारागिरांना वर्तमानकाळात
कला कौशल्याशी जुळते न घेता आल्यामुळे आदिवासींच्या पारंपारिक कला वाजूला
गेल्या व काही नष्टही झाल्या. यंत्रोद्योगामुळे त्यांची गळचेपी झाली. तरीदेखील
बांबूकामाचे कौशल्य आदिवासी भागात टिकाव धरून राहिले आहे.

बांबूपासून आदिवासींनी निर्माण केलेल्या वस्तू तीन प्रकारच्या असतात :

(१) धार्मिक ( Ritualistic )

(२) उपयोगी ( Ultlatarian )

(३) वैयक्तिक ( Individualistic )

बांबूकामासाठी लागणारा बांबू आदिवासी नजिकच्या जंगलातून तोडून आणतात. गरजेनुसार ४-६ दिवस बांबू सुकवितात. बांबूकामासाठी विशेष अशी हत्यारे त्यांना लागत नाहीत. मोठ्या आकाराचे चाकूचे पाते आणि बोथलेल्या भाल्याचे धारदार टोक काही आदिवासींना पुरेशी असतात. कोयत्याच्या आकाराचे "हैट्टाठ" अगर "अैती" या नावाने ओळखले जाणारे हत्यार बांबूकामासाठी वापरण्यात येते. हे हत्यार आखूड व तीक्ष्ण धारेचे असते. त्याचा दांडा लाकडी असतो. हत्याराचे पाते सपाट व चपटे असते. टोकाकडे बाक देवून दांड्याकडे हत्यार जाड असते. टोकाकडील बाजू जास्त रुंद असते. हे हत्यार वेगवेगळ्या नांवाने ओळखले जाते. हत्याराच्या जाडीत, लांबीत व अेकूण रचनेतही थोडाफार फरक असतो. अशी हत्यारे आदिवासींच्या आठवडे बाजारातून किंत मिळू लागली आहेत. "इला" किंवा "विळाही" या कामासाठी वापरला जातो.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या बांबूकामाचा बारकाईने अभ्यास केल्यास बांबूकामातील पट्टा विणण्याच्या दोन पध्दती आहेत असे दिसते :

(१) सपाट गुंफण, (२) गोलाकार गुंफण.

विणकामाच्या भाषेत "ताणा" व "वीण" असे विणकामाचे दोन भाग पडतात. कापडाच्या अपेक्षित लांबी व रुंदीचे अेवढे सुताचे धागे म्हणजे "ताणा" या ताण्यावर आडवे अेकाआड अेक विणत जाणारे सूत म्हणजे "वीण" होय. आदिवासींच्या बांबूकामात त्यांच्या गुंफण्याचे अनेक प्रकार दिसतात :

उभ्या-आडव्या पट्टयाची क्रमाने अेकाआड अेक अेकदा वर अेकदा खाली अशी क्रमाने घेतलेली वीण.

ठरावीक पट्टया सोडून "वीण" खाली घेवून ठराविक पट्टयानंतर पुन्हा वर घेतलेली वीण.

त्यातील आणखी काही वैशिष्टये खालीलप्रमाणे दिसतात. :

(१) दोन अगर जास्त पट्टयांची वीण.

(२) ताणा व वीणेच्या ३-४ पट्टया अेकसारख्या क्रमाने गुंफणे.

(३) वीणेच्या दोन पट्टया वळून घेवून ताण्यावर गुंफणे.

(४) "ताणा" रुंद परंतु जाडीला पातळ व वीण जाड कांबीची ठेवणे.

(५) "ताणा" पातळ जाड कांबीचा व "वीण" बारीक लवचिक पट्ट्यांची असणे.

(६) ताण्याच्या पट्ट्या तिरक्स ठेवणे.

वरील प्रकारचे अनेक काकावे बांबूकामात असतात. निश्चित आकाराच्या वस्तूसाठी सर्वसाधारणपणे अेकाच प्रकारचे बारकावे असतात. प्रत्येक जमातीतील ह्या कलाकौशल्यात वेगळेपणा, पण अेका जमातीत सारखेपणा आढळतो. उुदाहरणार्थ मुरबाड तालुक्यातील (ठाणे जिल्हा) ठाकर जमातीने तयार केलेल्या टोपल्या व किनवट तालुक्यातील कोलाम लोकांनी तयार केलेल्या टोपल्या, ह्या रचनेत व विणकामात निरनिराळ्या लोकांनी तयार केलेल्या दिसतात. त्यांमुळे प्रत्येक जमातीची टोपली(*) सारखीच बनविली जाते. विणकामाची सुरुवात करण्याच्या क्रियेला मूळ करीत आहे आणि टोपलीचे काम पूर्ण झाल्यावर "टोपली शिवून झाली" असे काही जमातीत म्हटले जाते. शेवटच्या अगर कडेच्या पट्ट्या किंवा कांवी लांबीला कमी असतील तर "जोड लावण्यात" येतो. शेवटच्या ताण्याच्या पट्ट्या "दुमडून घेऊन वीणे" प्रमाणे तीन-चार घरे विणलेल्या असतात. टोपल्यांच्या कडा अशाच प्रकारे दुमडल्या जातात आणि वीणा गोफा-सारखी केलेली असते. पाणी ठेवण्याचा भोपळा गुंफताना हीच पध्दत अवलंबिली जाते.

बांबूपासून कोणती वस्तू बनवावयाची आहे त्या कामाच्या स्वरूपावरून व वस्तूच्या आकारानुसार "ताणा" वाटोळा, गोलाकार, सपाट, चौकोनी इत्यादि आकारांचा करावा लागतो. मूळ करताना ताण्यांच्या पट्ट्या प्रथम जुळवून घेतल्या जातात. टोपलीसाठी गोलाकार हवा असल्याने बांबू पट्ट्यांचे मध्य अेकावर अेक ठेवून त्यावर पायाच्या टाचेने दाब देऊन किंवा दोन्ही पाय मध्यावर ठेवून बसविली जातात. नंतर वीणेची गुंफण जशी फिरेल तसे फिरत रहातात. आवश्यक आकार तयार झाल्यावर उुरलेली टोके तोडून दुमडून पुढील पट्ट्यात विणून घेतात. ही शेवटची वीण महत्वाची असते, त्यामुळे "ताणा" व "वीण" या दोघांनाही घट्टपणा येतो. साधारणतः शेवटची वीण दोरखंडासारखी दिसते. त्यामुळे वस्तूला मजबूती येते. पट्ट्या वीणीतून सुटण्याची शक्यता रहात नाही व वस्तू टिकाऊ होते. वस्तूच्या आकारानुसार पट्ट्यांची लांबी ठरविली जाते. "साकुरी, हेटेसाकुरी" सारख्या टोपल्यांसाठी अर्धा-पाउुण इंच रुंदीच्या पट्ट्यांची आवश्यकता असते. मोठ्या आकाराच्या पाट्या, टोपल्यांना त्यापेक्षा जास्त रुंदीच्या पट्ट्या हव्या असतात. कणगीसाठी पातळ पट्ट्यांची गुंफण बुऱ्या जाड काम्ठ्यांभोवती केलेली असते. विणण्यासाठी पट्ट्या घ्यायच्या की "छामट्या" हे वस्तूच्या आकारावरून निश्चीत करतात. वस्तूचा टिकाऊपणा, आकार, लक्षात घेऊन कोणत्या प्रकारचा बांबू वापरावा हे ठरविले जाते. कक्क हा बांबू मोठ्या पाट्यांसाठी उुपयोगाचा नसतो.

(*) ओळखता येते. मात्र ठाकर जमातीच्या किंवा कोलाम ..१६

जंगलातून तोडून आणलेला ओला बांबू चिरण्यास व वळण्यास सोपा असल्याने ओल्या बांबूपासून वस्तू बनविणे सोयीचे असते. वस्तू तात्काळ हवी असल्यास ओल्या कांबी वापरतात त्यामुळे बांबूचा नैसर्गिक रंगही राहतो. टिकाऊ, दणकट व चांगल्या कामासाठी वाळलेला बांबू भिजवून मऊ झाल्यावर वापरण्यात येतो.

घराच्या भिंतीसाठी वापरला जाणारा बांबू चिवट व टिकाऊ असतो. त्याच्या पट्या साधारण १ इंच रुंदीच्या व १ सेंटीमीटर ते १ इंच जाडीच्या असतात. पट्या भिंतीच्या लांबी रुंदीइतक्या लांबीच्या कापून पाण्यात चांगल्या भिजवून घेतात. भिंतीच्या तट्यांची वीण वेगवेगळ्या प्रकारची असते. एका आड एक अशा विणकामाचा तट्या सुरक्षित नसल्याने सुरक्षित तट्यांसाठी दोन, तीन, चार अगर पाचही पट्या घालून असेच वरून वीणलेल्या असतात. अशा प्रकारच्या वीणकामातून रेषांचे अनेक चौकोन निर्माण होतात. ते तट्यांच्या एकूण रचनेला व आकारास शोभा आणतात. पट्या वर-खाली गुंफत असताना विषम संख्येतील पट्यांच्या मधील पट्टीची मध्येच दुहेरी वीण घेतल्यामुळे रेखाकृती जास्तच शोभिवंत होते. नाजूक आणि लहान आकाराच्या वस्तूंसाठी बांबूच्या कामट्या सुबक व लवचिक असतात. अनुभवांवरून कोणत्या आकाराच्या वस्तूसाठी किती पट्या घ्याव्या लागतील याचा अंदाज येतो. यंत्र चालावे तसे बांबूकाम करणारे हात भराभर चालतात. वेगवेगळे नक्षीकाम पट्यांच्या वीणेतून घ्यावयाचे असेल तर "गुंफण" वेगळी घ्यावी लागते. कुशल बांबूकाम करणारा आदिवासी बघता बघता "वीयूथा", "भोताड", अगर "फुलेरी" तयार करतो. झाकणांच्या टोपल्यांचे आकार मोहक असतात व विणही सुबक असते. बांबूच्या पाट्या विणण्यात सह्याद्रीच्या पश्चिम घाटातील छठाकर" जमातीत हे कौशल्य आहे. माडिया गोंड घराच्या भिंतीसाठी, तट्यासाठी व चटईसाठी वेगळी तंत्रे वापरतात. दुर्गम भागातील माडिया शेतीचे व घरांचे जंगली प्राण्यांपासून रक्षण करून घेण्यासाठी बांबूच्या तुकड्यांचा उपयोग करून घेतात. झोपडीच्या मागील बाजूस ५-६ फुटाच्या पट्यात ४ ते ५ इंचाच्या अंतराने असे बांबू उभे गाडतात. जमिनीवरील टोक तीक्ष्ण केलेले असल्याने आत शिरू पाहणाऱ्या प्राण्यास इजा होते, शिवाय उडी मारून येणारा प्राणी प्राणघातक जखमा झाल्याने अडकून पडतो. अशीच व्यवस्था शेतीच्या आजुबाजूसही केली जाते. त्यामुळे घरांचे व शेतीचे चांगल्या प्रकारे रक्षण होते.

थोडक्यात निश्चित उपयोगाच्या उद्देशाने आदिवासी बांबूच्या वस्तू बनवितात. "बांबूकाम" कलेतील तंत्राचा अभ्यास करणाऱ्यांना आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संग्रहालयातील वस्तू पाहता येतील. आदिवासी विभागातील अनेक जमातींच्या बांबूकामांचे विविध नमुने संस्थेने गोळा केलेले आहेत.

..१७

आदिवासी अनेक कारणांसाठी बांबूवर सोपस्कार करतात. घरे शाकारण्यास, घरे शाकारण्यास, तट्टे, टोपल्या, चटया, खाटा विणण्यासाठी, खेळणी, फण्या, बनविण्यासाठी, भोपळा, टिकाऊ वस्तू बनविण्यासाठी, मासे व पक्षी पकडण्यासाठी निरनिराळे फासे, सापळे, ते ठेवण्यासाठी, पिंजरे तयार करण्यासाठी, पाणी आणण्यासाठी, ताडी काढण्यासाठी इरले, रेली, सातोडी, मळई, लग्न-बाशिंगे, धान्याच्या कोठ्या-कणग्या, घरांच्या आतील भिंती, धनुष्य बाण व निरनिराळी वाद्ये बनविण्यासाठी अशा कितीतरी वस्तू बनविण्यासाठी आदिवासी बांबूचा वापर करतात. त्यापैकी काही ठिकाणांच्या बांबूकामाची वर्गवारी पुढे दिली आहे.

| अ.क्र. | बांबूकामाचा प्रकार | विभाग | जमात |
|---|---|---|---|
| १) | घराच्या भिंती | (१) अक्राणी महाल, शहादा, तळोदा अक्कलकुवा, तालुका, धुळे जिल्हा | भिल्ल, पावरा भिल्ल. |
| | | (२) चोपडा तालुका, जळगांव जिल्हा | पावरा भिल्ल. |
| | | (३) सिरोंचा व गडचिरोली तालुका, चंद्रपूर जिल्हा | गोंड, माडिया गोंड, परधान, हलबा. |
| | | (४) वणी तालुका, यवतमाळ जिल्हा | गोंड, कोलाम. |
| २) | खाटा (खटिया) | (१) भामरागड, अहेरी विभाग, चंद्रपूर जिल्हा | गोंड, माडिया गोंड. |
| | | (२) मेळघाट तहसिल, अमरावती जिल्हा | कोरकू. |
| | | (३) चोपडा तालुका, जळगांव जिल्हा | पावरा भिल्ल. |
| ३) | चटया | सिरोंचा तहसिल, चंद्रपूर जिल्हा | माडिया गोंड. |
| ४) | फण्या (फिचाडी) | भामरागड, अहेरी, कोरची परिसर, चंद्रपूर जिल्हा. | माडिया गोंड. |
| ५) | पक्षी ठेवण्याचे पिंजरे (केटपूर्गी) | (१) सिरोंचा तालुका, चंद्रपूर जिल्हा | माडिया गोंड, गोंड. |
| | | (२) किनवट तालुका, नांदेड जिल्हा | राजगोंड, कोलाम. |
| ६) | पक्षी पकडण्याचे फासे (कोज्जी डवी) | (१) चंद्रपूर | माडिया गोंड, गोंड. |
| | | (२) धुळे | परधान, भिल्ल. |
| | | (३) नाशिक | कोकणा, कातकरी. |
| | | (४) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग व | वारली, कातकरी. |
| | | (५) अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तहसिल. | कोरकू, निहाल. |

| अ.क्र. | बांबूकामाचा प्रकार | विभाग | जमात |
|---|---|---|---|
| ७) | धान्य साठविण्याच्या कणग्या | (१) साक्री, नंदुरबार, शहादा तालुके, धुळे जिल्हा | भिल्ल |
| | | (२) चोपडा तालुका, जळगांव जिल्हा | भिल्ल. |
| ८) | भाजीपाला, फळे, फुले यांच्या "फुले-या" | (१) मेळघाट तहसील, अमरावती जिल्हा | कोरकू. |
| | | (२) धानोरा, कुरखेडा विभाग, चंद्रपूर जिल्हा | गोंड, हलबा, माडिया गोंड, परधान. |
| ९) | लहान टोपल्या साकुरी "विकुरा" | सर्व आदिवासी विभाग | .. .. |
| १०) | शेतीकामाच्या पाट्या | (१) मुरबाड, शहापूर तालुके, ठाणे जिल्हा | "क" व "म" ठाकूर वारली. |
| | | (२) वणी, केळापूर तालुके, यवतमाळ जिल्हा | कोलाम. |
| | | (३) धानोरा, कुरखेडा विभाग, चंद्रपूर जिल्हा | गोंड, परधान, माडिया गोंड. |
| ११) | बी-बियाणाच्या टोपल्या | (१) मेळघाट तहसील अमरावती जिल्हा | कोरकू. |
| | | (२) वणी तहसील, यवतमाळ जिल्हा | कोलाम, गोंड. |
| | | (३) अक्राणी महाल, धुळे जिल्हा | भिल्ल. |
| १२) | मासे पकडण्याचे प्रकार "तेलेडुंका", "मळई", "भोलड", "कोळ्नी", वगैरे. | (१) शहादा, अक्कलकुवा, अक्राणी महाल, धुळे जिल्हा | भिल्ल. |
| | | (२) आदिवासी विभाग, ठाणे जिल्हा | ठाकूर, कातकरी, वारली, कोकणी. |
| | | (३) सिरोंचा, गडचिरोली, तहसील, चंद्रपूर जिल्हा | गोंड, माडिया गोंड हलबा. |
| | | (४) सुरगाणा, कळवण व पेठ तालुका, नाशिक जिल्हा | कोकणा. |
| | | (५) वणी तालुका, यवतमाळ जिल्हा | गोंड. |
| | | (६) मेळघाट तहसिल, अमरावती जिल्हा | कोरकू. |
| १३) | टोप्या, छत्र्या, इरले, रेखी सातोडी व तत्सम | सर्व आदिवासी विभाग | ... |
| १४) | लग्न बासिंग "टोपल्या" | धुळे जळगांव जिल्ह्यातील आदिवासी भाग | भिल्ल. |

..१९

| अ.क्र. | बांबूकामाचा प्रकार | विभाग | जमात |
| --- | --- | --- | --- |
| १५) | बांबूची वाद्ये "तारपा" "डोरे" पिपा | ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग | वारली. |
| १६) | पावा, पाली. | (१) वणी, केळापूर, तालुके, यवतमाळ जिल्हा | कोलाम. |
| | | (२) ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग | कातकरी, ठाकर, वारली. |
| १७) | दोर | सिरोंचा, गडचिरोली तालुके, चंद्रपूर जिल्हा. | गोंड, माडिया गोंड. |
| १८) | रंगित गोंडे | अमरावती जिल्ह्यात मेळघाट तहसिल | कोरकू. |

ही वर्गवारी ढोबळमानाने केलेली आहे. यासारख्या अनेक वस्तू आदिवासी लोक बांबूपासून बनवितात. आदिवासी बांबूच्या वस्तु स्वत:च्या उपयोगासाठी बनवितात. कारागिराची कुशलता व आत्मीयता त्यामुळे वस्तू प्रकर्षाने जाणवते. उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून वस्तू दणकट व टिकाऊ बनविलेल्या असतात. आदिवासींनी तयार केलेल्या वस्तू अन्य कारागिरांच्यापेक्षा कलाकुसर व कुशलता या दृष्टिकोनातून निराळ्या वाटतात. हे गुण लक्षात घेऊन आदिवासींच्या आवश्यक वस्तुंपासूनच हस्तकलेचे नमुने निर्माण केले जातात. त्यांनाच Decorative Art in Tribal Handicrafts म्हणून संबोधिले जाते.

आदिवासींना त्यांच्या शेतकीकामासाठी "पाटी"ची आवश्यकता असते तशी "पाटी" ही वस्तू बहुउपयोगी आहे. आदिवासी पाटीला चांगली मागणी असते. ठाणे जिल्ह्यातील ठाकूर जमातीच्या आदिवासींनी आणलेल्या पाट्या जुन्नर व राजूरच्या बाजारात उन्हाळ्याच्या सुरुवातीपासून विकल्या जातात. चोपड्याच्या बाजारात कणग्या चैत्रानंतर विकण्यासाठी येतात. पाट्यांना, टोपल्यांना पळसीच्या फुलांपासून तयार केलेले रंग दिलेले असतात. त्यामुळे त्या अधिक मोहक वाटतात.

आदिवासींच्या एकूण आर्थिक जीवनात बांबूकाम हा व्यवसाय चांगला आधार देऊ शकेल. आदिवासींचे बांबूकामात नैपुण्य व कुशलता आहे. परंतु बाजारी स्पर्धेच्या दिखाऊ वस्तु त्यांच्या कुशलतेला व नैपुण्याला मागे टाकत आहेत. त्यातून आदिवासी स्वत: "मीतभाषी" आहे. त्यामुळे त्यांच्या पारंपारिक कलेचा -हास होत आहे.

..२०

आदिवासींच्या गरजा मर्यादित असतात. वस्तू अुत्पादनाचा वेग गरजांशी संबंधित असल्याने वस्तूही मर्यादित संख्येने तयार होतात. केवळ जीवनावश्यकतेसाठीच निर्मित वस्तू "बाजारी" स्पर्धेत टिकू शकत नाहीत. वेळेचे बंधन पाळण्याची आदिवासींना सवय नाही. त्यामुळे आदिवासी मोठ्या प्रमाणावर अुत्पादन करू शकला नाही. आता तर त्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू बाजारात अल्प दरात अुपलब्ध होअू लागल्या आहेत. त्यामुळे तो निष्क्रिय होअू लागला आहे. त्यासाठी आदिवासींच्या या कुटीरोद्योगास संरक्षण द्यायला हवे. त्यांच्या व्यवसायाला चालना मिळावयास हवी. त्यासाठी बांबूकामाचे क्षेत्र, अुत्पादन क्षमता, मालाची अुपलब्धता, मनुष्यबळ कौशल्य आणि आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीच्या अनुषंगाने विचार करावयास हवा. आदिवासी विकास महामंडळासारखी आदिवासी क्षेत्रात खेड्यापाड्यापर्यंन्त पोहोचलेली निमसरकारी संस्था या क्षेत्रात महत्वाचे कार्य करू शकेल. या पारंपारिक धंद्याची महत्वाची ठिकाणे शोधून, अुत्कृष्ट कारागिरांना पुढे आणून, त्यांच्या आदिवासी हस्तकलांना अुजेडात आणून सक्रिय सहभाग देअू शकते. आदिवासी अुपयोजना क्षेत्रात पारंपारिक आदिवासी कारागिरांना या धंद्यातील आधुनिक तंत्रे शिकविता येतील. पारंपारिक कौशल्यास व्यवसायाकडे वळविण्यास हे फार महत्वाचे व योग्य दिशा देणारे पाअूल होईल. त्यांना मालाच्या अुठावाबरोबर अुत्पादनाचा वेग वाढविण्यासाठी नवी तंत्रे, ओल्या-सुक्या बांबूसंबंधीच्या नव्या प्रक्रिया, रंग-कामातील आकारांचे इत्यादी बाबी शिकविण्याची गरज आहे.

## (२) लाकडावरील कोरीव काम

दैनंदिन गरजासाठी आदिवासी लाकडाचा अुपयोग करतात. शेतीची औजारे, घरे, देवदेवतांच्या मूर्ती, मुखवटी, खटारगाड्या, खाटली (बाजा) चौकटी, भाले, आयुधे, पारंपारिक अुपयोगाची भांडी, इत्यादी वस्तू लाकडाच्याच बनविलेल्या असतात. आदिवासींची लाकडी औजारे साधीच असतात. ठरावीक हंगामासाठी अुपयोग हाच त्यांचा मुख्य अुद्देश असतो. आदिवासी विभागात लाकूड सहज अुपलब्ध होते. त्यामुळे लोक लाकडाचा टिकाअुपणा तितकासा विचारांत घेत नाहीत. कांही आदिवासी नांगराच्या मुठीला आणि दांड्याला पक्षांचे आणि प्राण्यांचे (शक्यतो मोरांचे बैलाचे आणि घोड्याचे) आकार देतात. प्राण्याच्या देहऱ्यावरील तपशील नेमक आणि आकर्षक पद्धतीने कोरलेला असतो. काही आदिवासी जमातींच्या घरांत दरवाजा-समोरील लाकडावर गोत्रनिदर्शक असे सांकेतिक चित्र कोरलेले असते. बाजूच्या खांबावर त्या आदिवासी वैशिष्ट्ये दर्शविणारी नक्षी असते. यात सूर्यदेव व चंद्रदेवांच्या

प्रतिमा प्रामुख्याने दिसतात. भिल्ल लोकांच्या घरात मध्यवर्ती खांबावर मोराचे चित्र दिसले. लाकडावरील कोरीव कामाचे उत्कृष्ट नमुने हलबा लोकांच्या घरांत पहावयास मिळतात. चिचघाट, शिरपूर, सोनसरी, पेंढारी या चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील गांवी जुन्या घरांच्या लाकडांवर हत्तींच्या झुंजी, घोडे, हत्तीघोड्यांच कळप, साप, वेली, फुले, घोड्यांचे रथ, मिरवणूक, यासारखे विविध प्रकारचे कोरीव काम पहावयास मिळते. गडचिरोली व साकोली तहसीलमधील हलबांची घरे कोरी व लाकडाने सजविलेली आढळतात. कोरीव काम हे त्यांच्या घरांचे वैशिष्टय म्हणता येईल. कोरीव कामाचे हे कौशल्य आता कमी होऊ लागले आहे.

लाकडाच्या नैसर्गिक आकारात थोडा फेरफार करून ते लाकूड विविध उपयोगासाठी आदिवासी वापरतात. धडगांव जवळील चुलवड गांवी इंग्रजी Y अशा आकाराच्या फांदीचा उपयोग बैठकीसाठी केल्याचे आजही आढळून येते. अशाच फांदीच्या "बेचक्यांचा" उपयोग झोपडीसमोर पाण्याचा माठ, घागर किंवा अंथरूण-पांघरूण ठेवण्यासाठी केला जातो. लाकडांचा उपयोग करण्याची त्यात कल्पकता आहे. गोंड, भगतांच्या (पुजारी) हातामध्ये एक पूजेची काठी असते. तिला ते "माता" म्हणतात. या काठीची मूठ कल्पकतेने तयार केलेली असते. कोलखास येथे पाडसाला पाजणारी हरीण, विश्रांती घेणारा काळवीट ह्या कल्पना अशाच लाकडांच्या आकारामधून साकार केलेल्या आहेत.

प्रामुख्याने प्राथमिक कोरीव काम हत्या-यांच्या दांड्यावर धा-यांच्या मुठीवर केलेलेही आढळते. कु-हाड ही आदिवासींची संरक्षक.आठ-दहा वर्षांची कोरकू मुले मेळघाटच्या दाट जंगलातून कु-हाड खांद्यावर टाकून निर्धास्त फिरतात. त्यांचे दाण्डे कोरीव कामाने सुशोभित केलेले असतात.

लाकडी कोरीव कामामध्ये मुख्यत: तीन प्रकार दिसतात.

(१) तीक्ष्ण हत्या-याने तासून लाकडाला आकार देणे.

(२) तिक्ष्ण धारेच्या किंवा छन्नीसारख्या हत्या-यांनी कोरून नक्षीकाम करणे.

(३) पटाशी सारख्या तीक्ष्ण धारेच्या हत्या-यांनी आजूबाजूचा भाग छिलून नक्षीकामाचा उंचवटा तयार करणे.

लाकडी कोरीव कामाच्या संबंधात गोळा केलेल्या वस्तूंची वर्गवारी खालील प्रमाणे आहे.

(अ) देवदेवतांच्या मूर्ती.

(ब) भवाड्याचे व तत्सम नाचाचे मुखवटे.

(क) फण्या

(ड) तंबाखूच्या डब्या.

(इ) लग्नातील खांब (मुंडा)

(ई) मृतांच्या स्मरणार्थ उभारलेले खांब. (शिणोली)

भवाडी नृत्यातील मुखवटे मृतांची स्मारके, गाव देव, लग्नखांब, ह्यासाठी आदिवासींनी लाकडावर कोरीवकामाची किमया सुरु केली. ठराविक सोंगाचा मुखवटा परंपरागत किंवा पिढीजात वहिवाटीने प्रत्येकाच्या घरी रुढ झाला आहे व पुढे त्या प्रकारचे सोंग त्या गांवात फक्त त्या घरातला आदिवासीच घेवू लागला. नाचवू लागला. भवाडा नृत्य सा-या गावाचे नृत्य. परंतु सोंगे मात्र घरा घरातून ठरविलेली. अशा महत्वाच्या नृत्य समारंभाच्या वेळी आपल्या घराण्याचा - कुळाचा मुखवटा जास्तीत जास्त चांगला व्हावा या उद्देशाने त्यांच्यात सुप्त स्पर्धाहि निर्माण झाली. त्या स्पर्धेतून लाकडावर रेखिव कोरीव काम करण्याची कला भवाड्याच्या मुखवटयाच्या माध्यमातून संपन्न झाली.

भवाड्याचे कार्यक्रम मुख्यत: ठाणे-नासिक जिल्ह्यात सह्याद्रीच्या रांगांच्या पश्चिमेकडील व पूर्वेकडील भागात आजही चालतात. वैशाख महिन्यात गावोगावी भवाड्याचे कार्यक्रम होतात. या भवाड्यातून पूर्वजांच्या शूर कृत्यांचे गुनगान केले जाते तसेच समाजातील चाली रितीवरही विनोदी प्रहसने केली जातात. मुखवटे त्या दृष्टीने प्रसंगाला अनुरुप, व्यक्तिरेषेला योग्य असे बनविले असतात. भवाड्यातून रामायण महाभारतातील कथा विषयांवर आधारीत कार्यक्रमही होतात. मुखवटयांची रचना त्या दृष्टीने अनुरुप अशी करावी लागते. कागदी लगदा वापरुन कांही भागांत मुखवटे बनविले जाऊ लागले आहेत. त्यामुळे लाकूड कोरुन मुखवटे तयार करण्याची कला मागे पडू लागली आहे.

भवड्याचे मुखवटे मऊ लाकडावर कोरतात. त्यासाठी साबर, सालई, पायर, पांगारा, जांभूळ अशा हलक्या व मऊ लाकडावर हे कोरीव काम होते. मुखवटयाच्या आकारमानानुसार लाकूड घेऊन कु-हाडीने आकार देतात. त्यानंतर लाकडावर मुखवटा कोरतात. पटाशी, आ-या, किकर अशी हत्यारे असतील तर मुखवटा लवकर तयार होतो. अशी हत्यारे नसतील तेव्हा काम अडून रहात नाही. तीक्ष्ण धारेचा चाकू, खिळा, कोयता ह्यासारख्या जुजबी हत्यारांचा उपयोग करुन मुखवटा पूर्ण केला जातो. चेह-याचे कोरीव काम लाकडावर प्रथम होते. विविध प्रकारचे व आकाराचे चेहरे, विविध भावभावनांचे चेहरे, मुख्या, भिवया, गालाची, नाकाची ठेवण यासाठी केलेले कोरीव काम व कोरलेल्या नक्षी हुबेहुब असतात. मानवी शरीर रचनेचे बारकाईने केलेले निरीक्षण त्यातून दिसून येते. चंद्रपूरच्या भामरागड भागातही असे मुखवटे तयार केले जातात.

भवाड्याच्या मुखवट्यात सुर्यदेव, चंद्रदेव, ब्रम्हदेव, दैत्य, नृसिंह, रावण, हनुमान, देवी, वाघ, मारीच इत्यादिंचा समावेश असतो. लाकडावर फक्त मुखवट्याचे आकार दिलेले नसतात. त्यावर पानाफुलांचा, झाडांच्या सालींचा रंग देऊन ते रंगविलेलेही असतात. नैसर्गिक रंगात जंगलात मिळणारा डिंक, अंड्याचा पांढरा बलक व जीप्सम मिसळून रंगाचे उत्तम लेप तयार केले जातात. मुखवट्यावर सांकेतिक खुणाही असतात. चंद्रदेवापेक्षा सुर्यदेव श्रेष्ठ ही कल्पना चंद्रदेवाच्या मुखवट्यावर सुर्यदेवाची अशीच सांकेतिक आकृति कोरून दाखविलेली असते. कोलाम जमातीतही त्यांच्या ढेमसा नृत्यासाठी लाकडी मुखवटे तयार करतात. परंतु ही प्रथा ठाणे व नासिक जिल्ह्यात जास्त प्रचलित आहेत.

नृत्यासाठी वापरावयाचे कागदाचे मुखवटे, मेणाचे व भोपळ्याचे सुध्दा तयार करतात. भिल्लांच्या आस्वल सोंगाचे मुखवटे भोपळ्याचे असतात. शेणा-मेणाचा वापर केलेले मुखवटे नाजूक असतात. कागदाचा मुखवटा वजनाने हलका व वापरावयास सुटसुटीत असतो. त्यामुळे ठाणे - नासिक जिल्ह्यातून कागदांच्या मुखवट्यांचा वापर अलिकडे मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. वर्तमानपत्राचा कागद १५ ते २० दिवस पाण्यात प्रथम भिजू देतात. नंतर त्यांत भिजविलेला "मेथा" मिसळून त्यांचे चांगले मिश्रण करतात. हे मिश्रण कुटून घेतले की त्यातून कागदाचा चांगला व चिवट, "फॉम" तयार होतो. त्यांत डिंक घालून त्यापासून मुखवटा/ रंगविण्यासाठी बाजारांत मिळणारे रंग ही वापरले जातात.
तयार करतात. तो

देवदेवतांच्या मूर्ती :-

शतकानुशतके परंपरेने चालत आलेल्या देवदेवतांचे आकार आजही फारसे बदललेले नाहीत. अतिप्राचीन व दुर्मिळ मूर्तिंना महत्व अधिक आहे. आदिवासींनी देवदेवतांच्या पुजेसाठी मूर्ती तयार केल्या. पूजेसाठी प्रथम त्यांनी लाकडी मूर्तीच तयार केल्या असाव्यात.

आदिवासींमध्ये लाकडी मूर्तींच्या रुपात वाघ्यादेव, शिवाऱ्या, हिवाऱ्या, डुलारदेव, बडादेव, माता, मरियम माता, गावाबाहेरील देवी आणि गोंडांचे सात देव ईत्यादी देवी देवतांचा उल्लेख करावा लागेल. वाघ्या किंवा वाघ्यादेव हा ठाणे, पुणे, नगर, नासिक, धुळे, जळगाव व अमरावती ह्या जिल्ह्यातील आदिवासीत आढळते. लाकडावरील वाघ्याचे चित्र हाच त्यांचा वाघ्यादेव. लाकडी कोरीव काम केलेल्या पट्ट्यांच्या आधाराने बांधलेला झोपाळा म्हणजे डुलारदेव. देवळाच्या कळसासारखा वरच्या टोकास निमुळता होत गेलेल्या आकाराच्या लाकडावर मानवी चेहरा कोरलेला असतो ती आहे त्यांची माता. ६।७ इंच लांबीच्या १ इंच जाडीच्या

त्रिकोणी लाकडी पट्या म्हणजे मातिच्या घोड्याच्या आकारांचा लाकडी कोरीव आकार ही दुसरी माता. सुबक आकाराच्या पालखीत अुग्र चेहऱ्यांची मूर्ती हा आहे बडादेव क्मारमुंगी (आई) बाचमुईलो (बाप), अोगले (मुलगी), ओबपाल(सुसर) येम्झी (कासव. पेला (मुलगा), मुला (मुलगा), हे गोंडांचे सात देव : यातील ओगपाल व योम्मिली वेगळेच प्राण्याचे आकार असू बाकी मुसळासारखे लाकडी ठोकळे असतात, भगताच्या देव्हाऱ्यामधला वाघ्यादेवाचा आकार गावाबाहेर दाट झाडीत बसविलेल्या वाघ्यादेवापेक्षा वेगळा आहे. त्यांवरील कोरीव काम हे प्राचीन कलेचा जिवंत नमुनाच आहे. वाघ्यादेवाच्या अुचलेल्या शेपटीचे व अुघड्या जबड्याचे रूप त्यात दिसते. मातादेवीच्या डोक्यावर केसांचा कळसासारखा भाग असून त्याच्याखाली वर्तुळाकार चेहरा व त्यावर बसके व आंत ओढलेले नाक, सपाट गाल, तोंड लहान, परंतु ओठ जाड व खालच्या अुरलेल्या भागांत जोडलेले हात अशी प्रतीमा असते. वाघ्यादेव, शिवाऱ्या, हिरवा या देवांच्या चित्रकृतिमध्ये मनुष्याचा अेक आकार असतो. त्याने दोन्ही हात वर अुचलून घेतलेले असतात. हातामध्ये पूजेचे साहित्य व बळी देण्याची आयुधे असतात.

भामरागडाच्या परिसरात राहाणाऱ्या माडिया गोंडांमध्ये गावाच्या बाहेर ठेवण्यासाठी अेक देवी असते. ही देवी अंगावर कोणताही कपडा नसलेली परंतु नाकांत नथ, कानात नक्षीदार वळे घातलेली डोळे खोल, ओठ पातळ असलेली व्यवस्थित बांधलेला केसांचा बुचडा, गळ्यात दगडी मणी, शरीर अुघडे, अुजव्या हातात लाकडी पेटीचा आकार, डावा हात कोपरांत वाकवून अुचललेला, अंगठा अुभा दोन्ही पायांत अंतर ठेवून चालत असलेल्या अवस्थेत असल्यासारखी असते. आकार तसा अवदी ओबडधोबड परंतु अेकाच लाकडातून कोरलेली असते. बारकावे सर्वत्र सारखेच असतात. साधारणत: ६ इंचापासून दीड फूटापर्यंन्त हिचे आकार असतात. तसाच प्रकार कोरकूंच्या देवीचा आहे. यावर लाकडी पडटीवर साधारणत: १ फूटभर अुंचीची दीड ते दोन इंच रुंदीची १ इंचभर जाडीची असते. वरचा भाग घुमटाकृती कोरून त्याखाली पतंगाकृती चौकोनी भाग असतो. त्यात चार निमुळती टोकले असलेली चांदणी त्याखाली काही अंतर ठेवून अुरलेल्या भागापैकी खालच्या अर्धाभागात सोडून मधल्या भागात सर्वांत खाली मनुष्याकृती त्यावर चंद्रदेव त्यावर सुर्यदेव कोरलेले असून दोन्ही बाजूंनी नागमोडी नक्षी कोरलेली असते.

अशाच अेक लाकडी देव कोरकू मध्ये आहे. फक्त चित्रांच्या क्रमात बदल असतो. पतंगाकृति चौकोनांत वर्तुळ कोरून त्यामध्ये डोळे नाक, तोंड व कान कोरलेले असतात. गळ्याच्या खाली मोठी चंद्रकोर काढलेली असते. तीच्यामध्ये टोकाकडे निमुळती होत गेलेली चार टोकांची चांदणी व खाली अुग्र रूप धारण केलेला सूर्य

त्याखाली पुजेचे साहित्य घेऊन जाणारा मनुष्य अशी चित्राकृती असते.

ह्या लाकडी मूर्ती निर्मितीमागचा हेतू प्रतिकात्मक आहे. अशा मूर्ती ठाणे, नासिक, जिल्ह्यात वाघ्यादेव, शिवा-यादेव यांच्या आढळतात. वाघ्यादेवांचा फक्त मुखवटा लाकडी फळीवर कोरलेला असतो. कोरकूंचा "डोलार" अगर खुलारदेव "नरायनपेन", "बिगरहा", "मरीयाम माता", व गोंडांचा "बडादेव", "देवी", "माता" इत्यादि चित्रकृती अशाच असतात.

फण्या :-

आदिवासी संस्कृतीच्या वैशिष्टयामध्ये लाकडी फण्यांना वेगळेच महत्व आहे. त्यांच्या हस्तकलेच्या दृष्टीने फण्या या महत्वाच्या आहेत. चंद्रपूर जिल्हयाच्या पूर्व-दक्षिण सीमा भागांत ह्या फण्यांना सांस्कृतिक दृष्टया महत्व आहे. या भागात माडिया गोंड जमातीची प्रामुख्याने वस्ती आहे. हा भाग दुर्गम असून दळण-वळणाच्या साधनांचा इथे अभाव आहे. माडिया गोंड जमातीत कांही लोक "स्थलांतरीत शेती करतात या भागात बाजाराची ठिकाणे विरळ आहे. माडिया गोंड जमातीत झोपडी "घोटूल" नांवाची सार्वजनिक झोपडी अस्तित्वात आहे. पुरुष आणि स्त्रिया यासाठी वेगळीही घोटुले असतात. घोटूलमध्ये वयात आलेल्या मुलामुलींना जमातीच्या रितीरिवाजाचे धडे वृध्द व्यक्तिंच्या मार्गदर्शनाखाली दिले जातात. त्यांच्या परंपरागत हत्यारांचा सराव येथे केला जातो. तसेच जमातीतील शूर वीरांचे त्यांनी केलेल्या कृत्यांचे स्मरणही केले जाते. निरनिराळ्या प्रकारच्या नृत्य व गाण्यांचे धडेही इथेच मिळतात. थोडक्यात सांस्कृतिक जिवनाचे धडे देणारी "घोटूल" ही अेक शाळा मानली जाते.

"घोटूलचा" आणि त्यांच्या फण्यांचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. घोटूलच्या प्रांगणात वयात आलेली मुले-मुली रात्री अेकत्र जमून समूह नृत्ये करतात. नैसर्गिक आकर्षणाने तरुण पुरुष तरुण स्त्रीकडे आकर्षिला गेला व ते दोघे अेकमेकांना पसंत पडले. त्यांचे पुढे प्रेमात रुपांतर झाले तर त्यांच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून अशा फण्या अेकमेकांच्या केसांत सर्वांसमक्ष घालायचा घोटुलात रिवाज आहे. त्यांना आपल्या आवडी निवडीनुसार जोडीदार निवडण्याची मुभा असते. सामाजिक रीती रिवाजानुसार त्यांचे विवाह होतात. प्रगत समाजात "अेंगेजमेंटची" आंगठी घालतात. ह्याच कार्यासाठी "माडिया" आदिवासी फणी वापरतो. लाकडाची, बांबूची, किंवा बांबूच्या काड्यांची फणी ते स्वत: बनवितात.

फण्यांना अशाप्रकारे सांस्कृतिक महत्व असते. आदिवासींच्या ह्या फण्या हस्तकलेचे सुरेख नमुने असतात.

फण्यासाठी कोणत्याही प्रकारचे लाकूड वापरण्यांत येते. तैथील सागवान लाकूड तर आशिया खंडात वरच्या प्रतिचे मानले जाते. फण्या १ इंच ते ३ इंच रुंद असतात. फण्यांच्या दातामध्ये विविधता असते. कांही फण्या फक्त ३ दातांच्या असतात. फण्यांमध्ये जास्तीत जास्त ३० दाते असतात. फण्यांचे दात नेहमी विषमाच्या पटीतच असतात. तिन, सहा, नऊ, बारा, अशीच दातांची रचना असते. जोडीदार निवडीसाठी फण्या केसात खोवावयाच्या असल्याने त्या केसांत सहज बसतील अशा आटोपशीर केलेल्यां असतात. आपल्या प्रियकरणीच्या केसांना शोभतील अशा ह्या फण्या मुलायम करण्याचा प्रियकराचा प्रयत्न असतो. प्रेमाची ही प्रतिके सदैव प्रियकरणीच्या केसांतच असतात. स्त्री या प्रमाणे पुरुषाही केस वाढवून बुचडा बांधत असल्याने फण्या केसात ठेवण्याची पुरुषांनाही अडचण येत नाही.

फण्यांच्या दातांच्या संख्येवरुन लांबी-रुंदीवरुन जाडीवरुन प्रत्येक फणीचे वेगळेपण चटकन जाणवते. फणीच्या दातांची संख्या ठराविक नसल्याने व्यक्तिगत आवडीनुसार व कलाकौशल्यानुसार ह्या फण्या बनविल्या जातात. तिनच दात, पांच पांच इंच लांब, १-२ इंच व्यासाचा परंतु टोकाकडे निमुळता होत जाणारा, मागच्या चपट्या चौकोनी बैठकीतुन कोरुन काढलेले असतात. बैठकीवर सुंदर नक्षी काढलेली असते.

सहा दातांची फणी साधारणत: ३ इंच रुंदीची असते. दातांची मुळापासून लांबी १-३ इंचापर्यंन्त असते. फणीवर पक्षी, झाडे, फुले, अशासारखी नक्षी कोरलेली असते.

फण्या कोरणेचे दोन प्रकार आहेत. (१) तीक्ष्ण हत्याराने खांचा पाडून, (२) बाजूचा भाग वगळून त्यावर जाड रेषा काढणे. या दोन्ही प्रकारांत शीशाचा मुलामा दिलेला असतो. लाकूड कोरुन किंवा तासून केलेल्यां फण्या चंद्रपूर जिल्हयात इटापल्ली, कसन सूर, भामरागड, लाहेरी, कुवाकोंडी ह्या भागात आढळतात. अशा दुर्मिळ वस्तु आदिवासी देण्यास सहसा तयार होत नाही. त्यांना असे वाटते की आपल्या वस्तुवर अनोळखी माणसे कांहीतरी चेटुक करतील व त्यामुळे त्या वस्तुंच्या मुळ आदिवासी मालकांस जंगलांत त्रास, पिडा, सहन करावी लागेल. त्यामुळे कांही वस्तु आदिवासी देत नाही.

फण्या अनेक आकारांच्या असतात. प्रिय व्यक्तीसाठी फणी बनवावयाची मूळ कल्पना असल्याने कारागिरीचे सारे वैयक्तिक कसब इथे पणाला लावलेले असते. सर्व फण्या अगदी कलाकुसरीने युक्तच असतात असे नाही. साध्या फण्याही असतात. फण्या अर्धगोलाकार, पंचकोनी, आयताकार, सपाट, चपट्या, आखुड, लांबड, जाड

अशा निरनिराळ्या आकारात असतात. फण्या करण्यासाठी त्यांच्याकडे असलेली नेहमीच हत्यारे असतात. विळा, कु-हाड, चाकू किंवा खिळा, रूसी, कसेर, गोल्ठी, इत्यादी हत्या-यांनी फणी तयार होते. बाणांची टोके, भाले यांनी तासून, कोरून लाकडातून फणी आकार घेते. गारगोटीच्या दगडाच्या कडेच्या धारेने साळून साळून फणीला सुबकता येते. बाणांच्या टोकांनी नक्षीकाम केले जाते.

फण्यांवर नागमोडी, महिरपी, कोयरीसारख्या नक्षी असतात. पशु-पक्षांची चित्रं फुले ही कोरलेली असतात. जनावरांच्या शिंगापासूनही तयार केलेल्या फण्या आढळतात. शिंगाच्या फण्या लाकडी फण्यापेक्षा करावयास सोप्या असतात. शिंगामध्ये चिवट व लवचिकपणा असल्याने दात मोडण्याची भिती नसते. लाकडाच्या फणीत हा धोका असतो. त्यामुळे कारागिराला अतिशय काळजी घ्यावी लागते.

लग्न खांब (मुंडा) व मृतांच्या स्मरणार्थ उभारलेले लाकडी खांब (शिणोली-मरीसा, मुंडा). :

लग्न खांब :-

माडियागोंड, परधान, गोंड, हलबा, कोरकु या आदिवासी जमातीमधून लग्न मंडपामध्ये मध्यभागी संकेतानुसार लाकडाचा खांब उभा केलेला असतो. त्याला मुंडा असे म्हणतात. लग्नासारख्या शुभसमारंभासाठी हा लाकडी खांब उभा केलेला असतो. त्याला विशेष महत्त्व असते. हा खांब नव-या मुलाने स्वत: आणावयाचा असतो. नवरा मुलगा त्यावर आकृत्या कोरतो. हया खांबामध्ये विविधता आढळून येते. साधारणत: माडियागोंडांचा "मुंडा" मोहाच्या लाकडाचा असतो. कोरकूंचा मुंडा सागवान लाकडांचा असतो. लग्नाचे हे खांब, कुल निदर्शकहि असतात. कुळाचे मानचिन्ह त्यावर कोरलेले असते.

या लग्नखांबाची लांबी, रुंदी, उंची ठराविक नसते. कोरकुंचा लग्नखांब उंचीने, जाडीने लहान असतो. कोरकु भागांत कोरीव काम केलेले मुंडा आता दुर्मिळ होत चालले आहेत. त्यांच्या खांबांच्या चारी बाजुंना वेगवेगळ्या नक्षी असतात. माडिया गोंड लग्नाच्या खांबाबाबत जास्त हौशी असतात. त्यांचे लग्न खांबच जास्तीत जास्त मोठ्या आकाराचे असतात. जगदालपूरच्या मानवंश शास्त्र संग्रहालयाच्या प्रवेश व्दारापाशी प्रत्येक बाजू १ फूट जाडीचा व ७ फूट उंचीचा मुंडा ठेवला आहे. तो आदिवासींच्या कोरीव कामाचा नमुनाच आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या संग्रहालयांत प्रत्येक बाजू ८ इंच रुंद व ७ फूट उंच असलेला कारागिरांचा उत्तम नमुना ठरेल असा मुण्डा आहे. खेरीज

कोरकूंच्या मुण्ड्याचा उत्तम नमुनाही संस्थेच्या संग्रहालयात ठेवण्यात आला आहे.

सुर्य, चंद्र देवांची सांकेतिक प्रतिके अन्य प्राणी, स्वस्तिक नक्षी इत्यादी त्यावर कोरलेले असतात. मुंडाच्या अेका खांबातून कोरलेले घंटा, झुणरू देखील पहाव्यास मिळतात.

कोरकूंच्या आद्यापैकी टापा, गप्पा, टिचकुरी या वाद्यासाठी सुध्दा त्यांना लाकूड कोरावेच लागते. साधारणत: भजनातील टाळासारखा या "टप्पा" गप्पाचा आकार असतो. तसेच चौकोनी, षटकोनी आकार असतात. ही सारी वाद्ये लाकूड कामाचे नमुने आहेत. भिल्लांचे "इंदल" पूजेचे "झामळो" हे वाद्य ही लाकडावरील कोरीव नक्षीकामाचा नमुना असते.

## मृतांचे देव :-

शिणोली, मरसिंग मुण्डा, वीर, इत्यादि नांवानी आदिवासी जमातीतून मृतांच्या स्मृती प्रित्यर्थ लाकडी खांब अुभारण्यात येतात. गोंड, माडिया मध्ये त्यांना शिणोली, कोरकूमध्ये मरसिंगमुण्डा, तर कोकणा, वारलीमध्ये "वीर" "वीरगळ" म्हणतात.

शिणोलीचे आकार विविध आहेत. अगदी साध्या फळीपासून जाडजूड खांबापर्यंन्त व अुंच लाकडी वासेही त्यासाठी पुरलेले दिसतात. या सर्वांवर सांकेतिक चित्रे कोरलेली असतात. आदिवासींच्या धार्मिक कल्पना निसर्गाशी निगडीत आहेत. प्रत्येक सजीव, निर्जिव वस्तूत कोणतातरी जीव अगर आत्मा रहात असतो. त्यामुळेच प्रत्येक वस्तुला सचेतन रुप असते या कल्पनेतून आदिवासीमध्ये देव, पतीर, भूत, पिशाच्च, यांच्या कल्पना आल्या आहेत. मृतांचे देव ही अशीच अेक प्रथा असून मृतांच्या आत्म्याचा आपल्यावर कोप होअू नये, त्याला खूष करण्यासाठी हे सारे योजिन असते. मृतांची त्यांच्या गावातील प्रतिष्ठा, सामाजिक स्थान लक्षात घेवून शिणोलीचा आकार व प्रकार, त्यावरील कला कौशल्य कोरलेले असते. प्राण्यांचे आकार विशेषत: बैल, गवा, घोडा यांचे तोंडाचे आकार जास्त प्रचलित आहेत. सामाजिक दर्जानुसार खांबाची अुंची ठरते. त्यामुळे "गायता" या नायक कुटुंबातील मृतांचे खांब कोरीव कामासाठी प्रशंसनिय असतात. लाकडाबरोबरच दगडी खांबही काही ठिकाणी अुभारलेले असतात.

सह्याद्रि, सातपुडा यांच्या रांगातून राहणाऱ्या कोकणा, वारली, ठाकुर, व भिल्ल ह्या जमातीतून लाकडी खांब किंवा अुंच लाकडावरील वस्तु आढळतात. सुपली, वीरळ वीरगळ, इर, पितर ह्या सारख्या नांवाने ओळखले जातात. त्यांचे "टाक" ही तयार करतात. तसेच लाकडी फळ्याही अुभारतात. [illegible] "वीर"

आहे की "सुपली" हे त्यावरील प्रतिकावरुन समजुन येते. बाळंतपणात मृत झालेल्या बाईच्या प्रतिमेच्या शेजारी तिच्या मुलाची लहान प्रतिमा कोरलेली असते. अनेक विविध नक्षीकामांनी व्दद सालंकृत आकृत्या जाड लाकडी फळ्यांवर कोरलेल्या असतात. त्यावर चंद्र, सूर्य कोरलेले असतात. विदर्भातील यवतमाळ, अमरावती व चंद्रपूर जिल्ह्यात सह्याद्री सातपुड्याच्या रांगात पुणे, ठाणे, नासिक, धुळे, जळगांव या जिल्ह्यातील ह्या "शिपणोली किंवा थडगी आपापल्या परीने परंपरेची व संस्कृतीचे वारस आहेत.

तंबाखूच्या डब्या हे माडिया गोंड जमातीचे अेक वैशिष्टय आहे. लाकडातून कोरुन फळ्या जोडून ते ह्या "पागागोट्टा" किंवा पोथा तिदाण्णा घोंटूटाथ बनवितात. कठिण कवचाची फळे तसेच टणक सालीच्या बीयांचाही यासाठी उपयोग होतो. अशा आकाराच्या धातुच्याही डब्या बनवितात. धातुच्या व लाकडी डब्यांवर कलाकुसरीची कामे केलेली असतात. लाकडापासून पक्षांच्या आकाराच्या डब्या ते तयार करतात. मोर, लांडोर, कोंबडा यासारख्या प्राण्यांचे आकार त्यावरही दिसतात. पृष्ठभागावर सुंदर कलाकुसर किंवा रेषांचे जाळे कोरलेली असते. झाडांचे आकार झोपडीची चित्रे, नृत्य प्रकारही त्यात कोरल्याचे दिसून येतात. डब्यावरील नक्षी व इतर कोरीव काम डबीच्या मर्यादित आकारामुळे नाजूक असते .

आदिवासी सृजनशील आहेत. त्यांची हस्तकला अप्रतिम आहे. या साऱ्या प्रकारांस बाजारी रुप अजून आलेले नाही त्यामध्ये जीवंतपणा आहे. सांकेतांना अवलंबून नवरपुरांसाठी वेगळे काही तरी करुन त्यांच्या सांस्कृतिक जिवंतपणास गालबोट लावण्यास आदिवासी सहसा तयार नाही. आदिवासी हस्तकला अद्याप अंधारातच आहे. त्या कलेचे व हस्त कौशल्याचे संशोधन आणि संकलन झालेले नाही. संग्रहालयात आदिवासी हस्तकलावस्तुंचा अभाव जाणवतो. यापुढे आदिवासींची संस्कृती व त्यांची हस्तकला वैशिष्टये जतन करण्यासाठी लाकडी कोरीव कामाचा संभाळ केला पाहिजे. त्याला प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. चांगल्या कलाकारांना मदत केली पाहिजे. सर्व कलाकृतिंना बाजारपेठही मिळवून दिली पाहिजे. त्यासाठी अनुदानही द्यायला पाहिजे. सर्व बाजूनी होतील तेवढे प्रयत्न झाले तरच या हस्तकला जगविता येतील.

---ooo---